राज्यकर सहआयुक्त, नोडल ७ मुंबई, वस्तू व सेवाकर विभाग
यांचे कार्यालय, ८ वा मजला, ए- विंग, जुनी इमारत, माझगांव, मुंबई-४०००१०.

गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक. १०/०६/२०२५ मधील तरतुदीनुसार या विभागातील प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी नोडल/अपेल कामकाजाचा अनुभव असणारे गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) या पदावरून सेवानिवृत्त झालेले गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित), यांची आवश्यकता आहे. यास्तव प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी नोडल/अपिल कामकाजांचे अनुभव असणारे गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त झालेले गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित)यांची करार पद्धतीने एकुन राज्यकर अधिकारी १ व राज्यकर निरीक्षक ५ या पदाकरिता नियुक्ती करण्यासाठी सेवानिवृत्त गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) अधिकरी /कर्मचारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त अर्जांमधून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासुची तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांमधून योग्य उमेदवाराची नेमणूक सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक. १०/०६/२०२५ या शासन निर्णयामधील अटी व शर्तीच्या अधिन राहून करार पद्धतीने करण्यात येईल.

सक्षम उमेदवारांच्या निवडीबाबतचे अंतिम अधिकार तसेच पदाच्या संख्येत आवश्यक तो फेरबदल करण्याचा अधिकार मा. राज्यकर सहआयुक्त नोडल विभाग-०७, माझगाव, मुंबई यांना राहतील.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | आवेदन पत्र |
|---|---|
| १. उपरोक्त नमूद केलेल्या सेवानिवृत्त गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) मुल्यवर्धीत कर कायदा २००२ , मुंबई विक्रिकर कायदा १९५९ आणि केंदिय विक्रिकर कायदा १९५६/ वस्तू व सेवाकर कायदा २०१७ अंतर्गत नोडल/अपील कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.<br>२. सदर अर्जदार सेवानिवृत्त गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी.<br>३. अर्जदार मानसिक, शारिरिक व आरोग्यदृष्ट्या सक्षम असावा तसेच करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.<br>४. वित्तलब्धी-पात्र उमेदवारांची नेमणूक करताना सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक. १०/०६/२०२५ या शासन निर्णयामधील अटी व शर्तीनुसार त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता ) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणा-या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे ) कायम राहील.<br>५. उपरोक्त नमूद केलेल्या विविक्षित कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>६. आवश्यकता भासल्यास उमेदवाराची निवड करण्यासाठी मुलाखत घेतली जाईल.<br>७. नामिकासुचीनुसार नियुक्त करण्यात आलेल्या त्यांच्या कामाबाबत नियंत्रक अधिकारी समाधानी नसेल, तर अशा नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांच्या सेवा तात्काळ प्रभावाने रद्द करण्याबाबतचे अधिकार राज्यकर सहआयुक्त नोडल विभाग-०७, मुंबई यांना राहतील<br>वरीलप्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणा-या सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी/निरीक्षक यांनी आस्थापना अधिकारी, अपर राज्यकर आयुक्त, परीक्षेत्र ३ मुंबई, वस्तू व सेवाकर विभाग, ८ वा मजला , ए विंग, केबिन नंबर- ए-०८, माझगाव मुंबई यांच्याकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विहित नमुन्यातील अर्ज टपालाद्वारे अथवा ई-मेल (eonodal7mumbai@gmail.com) द्वारे सादर करावेत. | १. उमेदवाराचे संपूर्ण नाव<br>२. जन्म तारीख<br>३. संपर्कासाठीचा पत्ता<br>४. भ्रमणध्वनी क्रमांक<br>५. ई-मेल<br>६. सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद<br>७. सेवानिवृत्तीचा दिनांक<br>८. सेवानिवृत्तीचे कार्यालय<br>९. सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी<br>१०. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या तीन नेमणुका<br>११. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी<br>१२. शैक्षणिक अर्हता<br>१३. संगणकीय ज्ञान<br>१४. विभागीय चौकशी प्रलंबित आहे काय? असल्यास विवरण द्यावे.<br>१५. कार्यालयामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील (१०० शब्दांमध्ये) (अपिल कामकाजासह)<br><br>स्वाक्षरी<br><br>दिनांक<br>सही/-<br><br>राज्यकर सहआयुक्त (नोडल-०७)<br>वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई. |

Scanned with OKEN Scanner